# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,

**१७, डॉ. आंबेडकर मार्ग, लाल देवळाजवळ, पुणे-१**

Phone No. - ०२०-२६१२३०६६/६७ Email: mscepune@gmail.com Website: www.mscepune.in

**परीक्षा प्राधान्य** जा.क्र.मरापप/NMMS/Result/२०२०-२१/2365

**ई-मेल** दि.१८/०८/२०२१

प्रति,

मा.प्रसिध्दी महासंचालक,
प्रसिध्दी संचालनालय,
मंत्रालय विस्तारभवन,
मुंबई - ४०००३२.

**विषय :-** राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना परीक्षा (NMMS) २०२०-२१ इ.८ वी साठी परीक्षा दिनांक ०६ एप्रिल २०२१ विद्यार्थ्यांची निवडयादी प्रसिध्द करणेबाबत.

महोदय,

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे -१ यांचे मार्फत राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना परीक्षा (NMMS) इ.८ वी साठी परीक्षा दिनांक ०६ एप्रिल २०२१ रोजी घेण्यात आली. सदर परीक्षेमधून शिष्यवृतीसाठी पात्र झालेल्या विद्यार्थ्यांची निवडयादी दिनांक १८/०८/२०२१ रोजी परिषदेच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात येणार आहे. त्याचे "प्रसिध्दी निवेदन" सोबत जोडले आहे.

कृपया सदर वृत्तास विनामूल्य प्रसिध्दी द्यावी ही विनंती.

**आपली विश्वासू,**

शैलजा 18/8

**(शैलजा दराडे)**

**उपायुक्त,**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,

पुणे -१

स्थळ प्रत मा. आयुक्त यांनी मान्य केली आहे.

**प्रत :**

मा.प्रसिध्दी उपसंचालक,
प्रसिध्दी विभाग, मध्यवर्ती इमारत, पुणे-१

E:\2019-20\NMMS Result\Pressnote selected NMMS.

## प्रसिध्दी निवेदन

## राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना परीक्षा (NMMS) २०२०-२१

**इ.८ वी साठी परीक्षा दिनांक ०६ एप्रिल २०२१ ची शिष्यवृत्तीसाठी पात्र झालेल्या विद्यार्थ्यांची निवडयादीबाबत.**

सन २००७-०८ पासून राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना परीक्षा (NMMS) ही मिनिस्ट्री ऑफ ह्युमन रिसोर्सेस भारत सरकार नवी दिल्ली यांचे मार्फत राबविली जात आहे. आर्थिक मागास विद्यार्थ्यांमधून प्रज्ञावान विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांच्या प्रज्ञेची जोपासना, तसेच त्यांचे १२ वी पर्यंत शिक्षण पूर्ण व्हावे हा या योजनेचा गाभा आहे. प्रज्ञावान विद्यार्थ्यांना दरमहा शिष्यवत्तीच्या स्वरुपात आर्थिक मदत करण्यात येते. सदर शिष्यवृत्ती १२ वी पर्यंत मिळते. सन २०१७-१८ पासून शिष्यवृत्तीचा दर दरमहा रु.१०००/- आहे (वार्षिक रु.१२,०००/-).

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांचे मार्फत दिनांक ०६ एप्रिल २०२१ रोजी घेण्यात आलेल्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना परीक्षेची (NMMS) विद्यार्थ्यांना प्राप्त गुणांची यादी दिनांक २६.०७.२०२१ रोजी परिषदेच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आली होती. विद्यार्थ्यांना /पालकांना शाळेमार्फत जात, अपंगत्व, जन्म दिनांक इ.बाबतची दुरुस्ती असल्यास दि. ०४.०८.२०२१ पर्यंत परिषदेकडे nmms.msce@gmail.com या ईमेलवर पाठविणेबाबत सूचना देण्यात आलेल्या होत्या. विद्यार्थ्यांनी/पालकांनी शाळेमार्फत पाठविलेल्या दुरुस्त्यांचा विचार करुन **शिष्यवृत्तीसाठी पात्र झालेल्या विद्यार्थ्यांची निवडयादी दिनांक १८/०८/२०२१ रोजी** जाहीर होणार आहे.

NMMS इ. ८ वी परीक्षसाठी ९७६८५ विद्यार्थी नोंदविण्यात आले होते. सदरची परीक्षा दिनांक ०६ एप्रिल २०२१ रोजी घेण्यात आली. NMMS परीक्षेसाठी महाराष्ट्र राज्यासाठी ११६८२ शिष्यवृत्ती कोटा MHRD नवी दिल्ली यांचेकडून निश्चित केला आहे. महाराष्ट्र राज्याच्या आरक्षणानुसार संबंधित संवर्गातील विद्यार्थ्यांची निवड करण्यात येते. तसेच संबंधित संवर्गात अपंगासाठीचे ४% आरक्षण समाविष्ट आहे. सर्व जिल्हयांसाठी स्वतंत्रपणे इ. ७ वी व ८ वी ची विद्यार्थी संख्या व १२ ते १४ वयोगटातील संख्या यांच्या आधारे जिल्हयानिहाय कोटा निश्चित करण्यात आलेला आहे. ही निवडयादी व गुणयादी **महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या www.mscepune.in व www.nmms.msce scholarshipexam.in या संकेतस्थळावर दि.१८/०८/२०२१ रोजी पासून पाहता येईल.**

- **सदर परीक्षेचा निकाल व निवडयादी फक्त परिषदेच्या संकेतस्थळावरच उपलब्ध करुन दिली जाते. जिल्ह्यांनी, शाळांनी व विद्यार्थ्यांनी सदरचा निकाल परिषदेच्या संकेतस्थळावरुनच काढावयाचा आहे.**
- **शिष्यवृत्तीसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती वितरणाचे काम शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षणाधिकारी (माध्य.) व मा. शिक्षण संचालक (माध्य. व उच्च माध्य) यांचेमार्फत केले जाते.**

**(शैलजा दराडे)**
**उपायुक्त,**
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे -१

स्थळ प्रत मा. आयुक्त यांनी मान्य केली आहे.

**दि. १८.०८.२०२१**

E:\2019-20\NMMS Result\Pressnote selected NMMS.